


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक १९१ •शुक्रवार, दि.१० ऑक्टोबर २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955

# अतिवृष्टी व पूरग्रस्तांसाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे निदर्शने





## फक्त निधी जाहीर केला पण आणखी लाभ कोणालाच मिळाला नाही

**बीड । प्रतिनिधी**

दिनांक ०९/१०/२०२५ महाराष्ट्र राज्यातील अतिवृष्टी पूर परिस्थितीचे संकट मोठे आहे सुमारे २७ जिल्ह्यांना या अतिवृष्टी व पूर परिस्थितीचा सामना करावा लागत आहे. शंभरावर मृत्यू घडले आहेत. सुमारे ५० लाख हेक्टर जमिनीवरील पिके नष्ट झाली आहेत. याचबरोबर सुमारे ७६०० पेक्षा जास्त गावे पुरामध्ये बुडीत आहे. सुमारे ३००० पेक्षा जास्त जनावरे दगावली आहेत.१२ हजारावर लोकांचे स्थलांतर करावे लागले आहे. १९८८ च्या पूर परिस्थिती पासून पुनर्वसनासाठी पात्र असलेल्या गावांना पुराने विळखा घातला आहे. हजारो हेक्टर जमीन खरवडून गेली, कायमच्या नापिकीचा धोका निर्माण झाला आहे. आधीच डबघाईला आलेले ग्रामीण रस्ते वीजपुरवठा व दळवळण करण्याच्या ग्रामीण सुविधा चक्क मोडीत निघाल्या आहे. सत्ताधारी पक्षांच्या कार्यप्रणालीतून व स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधीच नसल्याने निरडावलेली नोकरशाही यंत्रणा जनतेच्या गरजा आणि संकट या बद्दल संवाद, नोंद आणि निवारण व उपाययोजना करण्यात सपशेल अपयशी ठरत आहे. धरणातून प्रचंड पाणी सोडल्याने नदी पात्राबाहेर पाणी किती क्षेत्रावर पसरणार याबद्दलचे योग्य अलर्ट देण्यात आलेले नाहीत यामुळे अनेक गावामध्ये नागरिकांना जीव मुठीत धरून रात्र काढावी लागली आहे.

या अतिवृष्टी चे रुपांतर पूर परिस्थितीच्या तीव्र संकटात रुपांतर करण्यात पाटबंधारे विभागाच्या गुन्हेगारी निष्काळजी कार्य प्रणालीने मोठ्या प्रमाणात हातभार लावला आहे. पाटबंधारे खात्याने धरणांचे परिचालन करताना धरणाच्या पाणलोट क्षेत्रात होणारा पाऊस हवामान विभागाचे अंदाज आणि नदी पात्राची पाणी वाहन क्षमता याबद्दल सर्वेक्षण नसणे पाणी फुगवट्यामुळे बाधित होणारी गावे आणि क्षेत्र येथे योग्य पूर्वतयारी व सूचना न देणे यामुळे हजारोंचे संसार उध्वस्त झाले आहेत. तर सत्ताधारी पक्षाच्या आशीर्वादाने जलयुक्त शिवार योजना व नदी-नाले खोलीकरण व रुंदीकरण या बद्दलचे अशास्त्रीय व कंत्राटदार प्रचुर कामे यावर सुमारे १५ हजार कोटीचा खर्च करून वरील गंभीर संकटाला जणू आमंत्रणच दिलेले आहे. सदर कामांच्या देखभाल दुरुस्तीसाठी फुटकी कवडी देखील ▶▶ उर्वरित पान २ वर

## गुड न्यूज, लाडक्या बहिणींच्या खात्यात सप्टेंबरचे १५०० रुपये काही तासात येणार,




**मुंबई । प्रतिनिधी**

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबाबत मोठी घोषणा केली आहे. सप्टेंबर महिन्याच्या लाभाचं वितरण उद्यापासून सुरु करण्यात येईल. येत्या दोन ते तीन दिवसात पात्र लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात सप्टेंबर महिन्याच्या सन्मान निधीची रक्कम जमा होईल, अशी माहिती आदिती तटकरे यांनी दिली आहे. आदिती तटकरे यांनी सर्व लाभार्थी महिलांनी दोन महिन्यांच्या कालावधीत ई-केवायसी प्रक्रिया देखील पूर्ण करुन घेण्याचं आवाहन केलं आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या सर्व पात्र लाभार्थ्यांना सप्टेंबर महिन्याचा सन्मान निधी वितरित करण्याच्या प्रक्रियेस उद्या पासून सुरुवात होत आहे. लवकरच योजनेतील सर्व पात्र लाभार्थ्यांच्या

▶▶ उर्वरित पान २ वर

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 'प्रधानमंत्री धन-धान्य कृषी' योजनेचा शनिवारी शुभारंभ : कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

### राज्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या कार्यक्रमात सहभाग नोंदविण्याचे आवाहन

**मुंबई । प्रतिनिधी**

प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजनेबाबत केंद्र शासनाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये घोषणा करण्यात आली होती. या योजनेचा शुभारंभ ११ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी साडेदहा वाजता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते भारतरत्न सी. सुब्रमण्यम सभागृह, पुसा, नवी दिल्ली येथे होणार आहे. महाराष्ट्र राज्यस्तरीय कार्यक्रम कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक सभागृह पुणे या ठिकाणी होणार आहे. कृषी



क्षेत्रात प्रयोगशील व प्रगतिशील कामगिरी करणारे ३०० हून अधिक शेतकरी या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. अशी माहिती कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

या योजनेमध्ये कमी उत्पादकता असलेले, कमी सिंचन क्षमता असलेले, कृषी कर्जाच्या उपलब्धतेबाबत समस्या असलेल्या ▶ उर्वरित पान २ वर

## घरफोडी करणाऱ्या चोरट्यास शिवाजीनगर पोलिसांनी केले १२ तासाच्या आत जेरबंद

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील स्वराज्य नगर येथील आकाश नवनाथ कातांगडे यांचे राहते घरी घरफोडी करुन चोरी करणारा चोर प्रथमेश किसन जाधव (वय २० वर्षे व्यवसाय मजुरी रा. पंचशील नगर, बीड) यास मोठ्या शिताफीने पकडले. पोलीस अधीक्षक , अपर पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन शिवाजीनगर चे पोलीस निरीक्षक किशोर पवार, यांचे नेतृत्वात सपोनि / गजाजन क्षिरसागर, पोहवा/ १६६४ रवि आघाव, पोना/४७० ज्ञानेश्वर मराडे, पोशि/६१७ अशोक राडकर, पोशि/२०७७ बाळु रहाडे, पोशि/३०५ दिलीप राठोड, पोशि/ ४८५ विलास कांदे यांनी त्यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याने सुरवातीला खोटी माहिती देवुन पोलीसांची दिशाभुल केली. परंतु पोलीसांनी तांत्रीक विश्लेषणाचे आधारे आरोपी निष्पन्न करुन गुन्हयात चोरलेला सोन्याचा ऐवज व दोन मोबाईल हे जप्त केले आहे. सदर आरोपी हा अभिलेखावरील गुन्हेगार असुन त्याने यापुर्वी देखील पोलीस स्टेशन शिवाजीनगर हद्दीत व बीड शहर हद्दीत घरफोडी करुन चोरी केली आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नवनित काँवत , अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग बीड श्रीमती पुजा पवार यांचे मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोर पवार यांचे नेतृत्वात यांनी कारवाई केली आहे.

## वार्ड क्रमांक २५ मधून ईश्वर शिराळे यांची लागणार वर्णी

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगर परिषदे निवडणूकिची रणधुमाळी सुरू झाली असून वॉर्ड क्र २५ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर यांचे विश्वासू ईश्वर शिराळे यांना वार्ड क्रं २५ मधून उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे. व जणसामान्य नागरिकांनमधून मागणी होत आहे. गेल्या दहा वर्षांपासून ईश्वर शिराळे हे



आमदार संदीप क्षीरसागर यांचे एक निष्टने काम करत आहेत व त्यांना नागरिकांच्या अडी अडचणीची जाणीव आहे. तशेच ईश्वर शिराळे यांचे वडील देखील नगरसेवक म्हणून निवडून आले होते त्यामुळे त्या अनुभवचा नक्कीच मता मध्ये ईश्वर शिराळे यांना फायदा होईल. असे वार्ड क्र २५ मधील नागरिक चर्चा करताना दिसत आहेत. त्यामुळे शिराळे यांचा नगरसेवक म्हणू नागरिकांना त्यांच्या समशा सोडवाण्यासाठी वार्डात विकास कामे करण्यासाठी नक्कीच फायदा होईल.

## यश ढाका हत्या प्रकरण... एसपी साहेब, चौदा दिवसांनतरही इतर आरोपींचा शोध लागेना

**बीड । प्रतिनिधी**

यश देवेंद्र ढाका या तरूणाची हत्या होऊन आज चौदा दिवस होत आहेत. तरीही या प्रकरणातील इतर आरोपी आणि पुरवणी जबाबातील आरोपींना अटक झालेली नाही. तपास सुरू आहे, पुर्ण चौकशी केली जाईल असे केवळ आश्वासनच मिळत आहेत. या प्रकरणात पुरवणी जबाबातील आरोपींचा



सीडीआर द्यावा अशी मागणी ढाका कुटूंबियाने केली आहे. मात्र पोलीस अजूनही तपासच सुरू आहे अशी उत्तरे देत असल्याने संताप व्ये होऊ लागला आहे. पुरवणी जबाबात प्रत्यक्षदर्शीने आरोपींची नावे घेतलेली आहेत. तरीही पोलीस त्या दृष्टीनेच आमचा तपास सुरू आहे असे सांगत असतील तर ढाका कुटूंबियांला न्याय कधी मिळणार असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. दरम्यान उत्तरप्रदेशमधील राज्यसभा सदस्य राजाराम यांच्यासह महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे उपाध्यक्ष मुकेश सारवान यांनी बीडमध्ये येऊन ढाका कुटूंबियांची भेट हत्या प्रकरणाची सर्व माहिती घेतली.

## एकनाथ शिंदेंचा बीड जिल्ह्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा हात

### मदतीचे तोरण हेच शिवसेनेचे धोरण: राजेश कदम

**बीड । प्रतिनिधी**

अतिवृष्टीमुळे बीड जिल्ह्यात निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीने शेतकरी व नागरिक मोठ्या अडचणीत सापडले आहेत. या भीषण परिस्थितीत हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरणा मानत महाराष्ट्र राज्याचे

▶▶ उर्वरित पान २ वर






## सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यासोबत गैरवर्तन करणाऱ्या राकेश केशव नावाच्या वकिलावर कार्यवाही करण्याची मागणी



**केज । प्रतिनिधी**

जातीय द्वेषातून सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यासोबत राकेश केशव नावाच्या वकिलाने गैरवर्तन केले त्यामुळे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर)पक्षाच्या वतीने जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला आहे. भारत देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश मा.भूषण गवई यांच्यावर जातीय मानसिकतेने राकेश केशव नावाचा वकील धावून गेला आणि तो पायातला बूट काढणार त्याचवेळी न्यायालयातील सुरक्षारक्षक त्याच्या दिशेने धावले व न्यायालयाबाहेर नेले त्यामुळे मोठा अनर्थ टळला सनातन का अपमान नही सहेंगा हिंदुस्तान अशा घोषणा सडलेल्या मनोवादी वकिलांनी यावेळी ▶▶ उर्वरित पान २ वर






# भारतात वाढती बेरोजगारी, नशाखोरी आणि गुन्हेगारीचे वाढते जाळे : एक गंभीर सामाजिक संकट

भारत हा तरुणांचा देश म्हणून ओळखला जातो. देशाच्या लोकसंख्येतील सुमारे ६५ टक्के लोकसंख्या ३५ वर्षांखालील आहे. हीच तरुणाई देशाच्या प्रगतीचा पाया ठरू शकते. परंतु आज हीच तरुणाई बेरोजगारी, नशाखोरी आणि गुन्हेगारीच्या दलदलीत अडकताना दिसते. ही स्थिती केवळ आर्थिक नव्हे, तर सामाजिक आणि नैतिक दृष्ट्याही गंभीर आहे. एका बाजूला शिक्षित तरुणांना रोजगार मिळत नाही, तर दुसऱ्या बाजूला निराशा, व्यसनाधीनता आणि गुन्हेगारीकडे कल वाढताना दिसतो. हा त्रिकोणी दुष्चक्र – बेरोजगारी, नशाखोरी आणि गुन्हेगारी – भारताच्या विकासाला गिळंकृत करत आहे.

### ● १. बेरोजगारीचे वाढते संकट :

भारताच्या आर्थिक विकासाचा वेग वाढत असला तरी रोजगारनिर्मितीचा वेग त्याच्या तुलनेत अत्यंत मंद आहे. दरवर्षी लाखो विद्यार्थी शिक्षण पूर्ण करून नोकरीच्या शोधात असतात, परंतु संधी मर्यादित आहेत.

कारणे : शिक्षण आणि रोजगार यामधील विसंगती – अनेक विद्यार्थी पदवीधर आहेत, पण उद्योगांना आवश्यक असलेले कौशल्य त्यांच्याकडे नाही. औद्योगिक वाढीचा मंद वेग, स्वयंचलित यंत्रसामग्रीमुळे रोजगारात घट. कृषी क्षेत्रावर अजूनही मोठ्या प्रमाणात अवलंबित्व असून, तेथे उत्पन्न अनिश्चित आहे. सरकारी नोकऱ्यांचा तुटवडा, आणि खाजगी क्षेत्रात स्थैर्याचा अभाव. या परिस्थितीत बेरोजगार तरुणांमध्ये मानसिक ताण, आत्मविश्वासाचा अभाव आणि भविष्याबद्दल असुरक्षितता वाढली आहे. हाच ताण पुढे नशेच्या व्यसनाला आणि गुन्हेगारी प्रवृत्तीकडे नेतो.

### ● २. नशाखोरीचा वाढता कहर :

भारतामध्ये नशाखोरी ही आता केवळ वैयक्तिक समस्या राहिली नाही, तर ती सामाजिक विषाणू बनली आहे. विशेषतः पंजाब,



हरियाणा, गोवा, महाराष्ट्र आणि हिमाचल प्रदेश या राज्यांमध्ये तरुणाई नशेच्या गर्तेत अडकली आहे.

नशेची कारणे : बेरोजगारीमुळे निर्माण झालेली निराशा व ताण चुकीचे मित्रपरिवार आणि एकदा करून बघ अशी मानसिकता. चित्रपट, सोशल मीडिया आणि संगीताद्वारे व्यसनाचे अप्रत्यक्ष आकर्षण. नशेच्या पदार्थांची सहज उपलब्धता आणि अंमलबजावणी संस्थांचा शिथिल कारभार.

परिणाम : नशेखोरीमुळे तरुणांचे आरोग्य नष्ट होते, कौटुंबिक कलह वाढतो, आणि सामाजिक स्थैर्य कोलमडते. व्यसनाधीन तरुण रोजगारयोग्य राहत नाहीत. नशा करण्यासाठी पैसे लागतात, आणि त्यामुळे अनेकजण चोरी, फसवणूक किंवा अमली पदार्थांच्या व्यापारात उतरतात. अशा प्रकारे नशाखोरी गुन्हेगारीला जन्म देते.

### ● ३. गुन्हेगारीचे वाढते जाळे :

गुन्हेगारी आज भारतातील जवळपास प्रत्येक शहरात, प्रत्येक गावात पसरली आहे. पूर्वी केवळ मोठ्या शहरांमध्ये गुन्हेगारीचे जाळे असायचे, परंतु आता ग्रामीण भागही त्याच्या विळख्यात सापडले आहेत.

गुन्ह्यांचे प्रकार बदलले आहेत : चोरी, दरोडे, खून, मादक पदार्थांची तस्करी यासोबतच आता सायबर गुन्हे, ऑनलाइन फसवणूक, महिला अत्याचार, आणि राजकीय गुन्हेगारी मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहे.

गुन्हेगारीमागील कारणे : आर्थिक विषमता आणि गरिबी. शिक्षणाचा अभाव आणि नैतिक मूल्यांची घट. बेरोजगारीमुळे वाढलेला ताण आणि निराशा. नशाखोरीमुळे विवेक हरवणे. भ्रष्टाचार आणि राजकीय संरक्षणामुळे कायद्याचा धाक कमी होणे. गुन्हेगारीचे हे जाळे समाजात भीती, असुरक्षितता आणि अविश्वासाचे वातावरण निर्माण करते. त्याचा थेट परिणाम देशाच्या विकासावर आणि गुंतवणूक वातावरणावर होतो.

### ● ४. तिन्ही समस्यांचा परस्परसंबंध :

या तिन्ही समस्या – बेरोजगारी, नशाखोरी आणि गुन्हेगारी – एकमेकांशी घट्ट जोडलेल्या आहेत. बेरोजगारीमुळे तरुण निराश होतात, निराशेमुळे नशेच्या आहारी जातात, आणि नशेमुळे गुन्हेगारीकडे वळतात. हा एक विकृत सामाजिक चक्र आहे, जो सतत स्वतःलाच पुनरुत्पादित करत राहतो.

### ● ५. उपाययोजना आणि दिशा :

या समस्यांवर उपाय शोधताना केवळ सरकारी धोरणे पुरेशी ठरणार नाहीत; समाज, शिक्षणसंस्था आणि कुटुंब यांची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे.

(१) शिक्षण व कौशल्य विकास : शिक्षण केवळ पदवीपर्यंत मर्यादित न ठेवता, त्याला रोजगाराभिमुख बनवणे आवश्यक आहे. स्किल इंडिया, मेक इन इंडिया यांसारख्या योजनांचा प्रभावी अंमल होणे गरजेचे आहे.

(२) रोजगारनिर्मिती : स्थानिक पातळीवर लघुउद्योग, स्टार्टअप्स, आणि कृषीपूरक उद्योगांना प्रोत्साहन द्यावे. ग्रामीण भागात रोजगार निर्माण झाल्यास स्थलांतर आणि ताण कमी होईल.

(३) नशाखोरीविरुद्ध कठोर कारवाई : अमली पदार्थांचा व्यापार थांबवण्यासाठी कडक कायदे आणि गुप्तचर यंत्रणांची कार्यक्षमता वाढवावी. शाळा–महाविद्यालयांतून व्यसनविरोधी मोहिमा सुरू कराव्यात.

(४) नैतिक शिक्षण आणि सामाजिक जबाबदारी : कुटुंब आणि शिक्षणसंस्था यांनी तरुणांमध्ये नैतिक मूल्ये, जबाबदारी आणि स्वअनुशासन निर्माण करण्यावर भर द्यावा.

(५) कायद्याची प्रभावी अंमलबजावणी : भ्रष्टाचारावर नियंत्रण आणि न्यायव्यवस्थेचा वेग वाढविणे गरजेचे आहे, जेणेकरून गुन्हेगारांना शिक्षा होईल आणि कायद्यावरील विश्वास दृढ होईल.

भारताचा सर्वात मोठा सामर्थ्यस्रोत म्हणजे त्याची तरुणाई. परंतु हीच तरुणाई बेरोजगारी, नशाखोरी आणि गुन्हेगारीच्या विळख्यात अडकली, तर देशाच्या विकासाचे स्वप्न अधुरे राहील.
या त्रिस्तरीय सामाजिक समस्यांचा सामना केवळ सरकारने नव्हे, तर प्रत्येक नागरिकाने आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवून करायला हवा. तरुणांना रोजगार, दिशा आणि प्रेरणा मिळाली तर भारताचे भविष्य उज्ज्वल राहील – अन्यथा लोकसंख्येचा लाभ हा लोकसंख्येचा भार ठरू शकतो.

–: संकलन :–
**शबनम मुजीब खान**
**छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)**

◆ पान 9 वरून पुढे...

## अतिवृष्टी व पूरग्रस्तांसाठी....

ग्रामपंचायतींना दिलेली नाही हे खुद्द कॅग (नियंत्रक व लेखापाल) ने आपल्या २०२० च्या लेख परीक्षणात ठपका ठेवला आहे. सिंचन प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात अशा प्रकारच्या अशास्त्रीय कामांना मंजुरी देण्याची कायदेशीर तरतूद नसताना पाणी हक्कासाठीचा कायदा मोडीत काढणारे धोरणच शेतकऱ्यांच्या मुळावर आले आहे. या आपत्तीमध्ये उध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना आणि जनतेला संपूर्ण नुकसान भरपाई आणि मदत देण्याची जबाबदारी सरकारची आहे. त्यासाठी विरोधी पक्ष आणि आंदोलक यांना विश्वासात घेवून संपूर्ण नुकसान भरपाई आणि मदत देण्याचे धोरण सरकारने ठरविणे आवश्यक आहे. या संपूर्ण समस्याबद्दल तत्काळ महाराष्ट्र विधीमंडळाचे अधिवेशन बोलाविण्यात यावे अशी म ागणी करीत आहोत. अशाच प्रकारच्या आपत्तीला तोंड देणाऱ्या कृषी प्रधान पंजाब राज्याने रु ५० हजार प्रति हेक्टर मदत व अन्य सुविधा जाहीर केल्या आहेत. देशात अग्रेसर असणाऱ्या महाराष्ट्राने त्याच्याही पुढे दोन पावले टाकून संपूर्ण नुकसान भरपाई आणि मदत केली पाहिजे. अतिवृष्टी आणि पूर परिस्थिती या गंभीर संकटात सापडलेल्या जनतेला सहाय्य करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यसाठी महाराष्ट्रातील तत्काळ महाराष्ट्र विधीमंडळाचे अधिवेशन बोलाविण्यात यावे व तातडीने निर्णय घ्यावेत. अतिवृष्टी व पूर परिस्थितीत मृत्यू पावलेल्या कुटुंबांना तत्काळ रु २५ लाख मदत या. जखमींना ५ लाख मदत द्या. अतिवृष्टी व पूर परिस्थितीची पीक नुकसानीसाठी रु ७० हजार प्रति हेक्टर नुकसान भरपाई अदा करा.या मदतीसाठी असलेली दोन हेक्टरची मर्यादा काढून टाका संपूर्ण क्षेत्रासाठी भरपाई अदा करा. मृत जनावरे यांची बाजार मुल्यानुसार भरपाई व मदत करा प्रचलित ३७ हजार मर्यादा २ लाख करा. आपतीग्रस्त शेतकरी व पशुपालकांच्या सर्व प्रकारच्या छोट्या व मोठ्या जनावरासाठी प्रत्येक शेतकऱ्यांना चारा अनुदान अथवा चारा डेपो चारा छावणी तत्काळ सुरु करा प्रचलित चारा अनुदान यामध्ये प्रतिदिन प्रति जनावर रु ३००/– बाढ करा.पुरामध्ये वाहून गेलेल्या पंपसेट, पाईप लाईन, ठिबक संच, शेती अवजारे याची नोंद करून बाजार मुल्यानुसार भरपाई द्या. पूर आणि अतिवृष्टी यामुळे माती वाहून गेल्याने किंवा गाळ साठल्याने नापीक झालेल्या जमिनीची संपूर्ण मुल्यांकनाप्रमाणे भरपाई या. आणि दुरुस्तीसाठी रु २ लाख एकरी मदत द्या.पीकविमा योजनेतील रद्द केलेले ट्रिगर सुरु करा व नुकसान भरपाईचे निकष शेतकरी केन्द्री करून १००% भरपाई या. पूर व अतिवृष्टीमुळे पडझड झालेल्या घरांसाठी किमान ५ लाख रुपयांची मदत करा. संपूर्ण घर गेलेल्यांचे पुनर्वसन करा. वरील मागण्याचे निवेदन सादर करण्यात आले. त्यावेळी कॉ.नामदेव चव्हाण कॉ. भाऊराव प्रभाळे, कॉ.जोतिराम हुरकुडे ,कॉ. डी.जी. तांदळे,कॉ. बी एस दहीवडे, कॉ मोहन परजणे,कॉ.नितिनभाऊ जायभाये,कॉ सुधाकर डोळस, कॉ योगेश वाघमारे,कॉ मीरा वैद्य,लेक लाडकी अभियान जि.सम न्वयक बाजीराव ढाकणे,इंटक कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष रामधन जमाले,डॉ. संजय तांदळे, देशमाने,अरुण कानाडे,मचवे,शिवहारी राऊत, नागरगोजे आदींची उपस्थिती होती.

## गुड न्यूज, लाडक्या....

आधार संलग्नित बँक खात्यात सन्मान निधी वितरित होणार आहे, असं आदिती तटकरे यांनी म्हटलं. आदिती तटकरे पुढं म्हणाल्या, महाराष्ट्रातील माता–भगिनींच्या अखंड विश्वासाने सुरू असलेली सक्षमीकरणाची ही क्रांती यशस्वीरित्या मार्गक्रमण करत आहे. ही वाटचाल अशीच अखंडपणे सुरू ठेवण्यासाठी मागील महिन्यापासून https://ladakibahin.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर E-KYC सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. पुढील २ महिन्यांच्या आत सर्व लाडक्या बहिणींनी E-KYC प्रक्रिया पूर्ण करावी ही नम्र विनंती, असं आदित तटकरे यांनी म्हटलं.

## प्रधानमंत्री नरेंद्र....

१०० जिल्ह्यांची निवड केंद्र शासनाने केली आहे. यात महाराष्ट्र राज्यातील पालघर, रायगड, धुळे छत्रपती संभाजी नगर, बीड, नांदेड, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली या नऊ जिल्ह्यांची निवड झालेली आहे. सद्य:स्थितीम ध्ये राज्यामध्ये केंद्र व राज्य शासनाद्वारे कार्यान्वित असलेल्या ३६ हून अधिक केंद्रीय आणि राज्य योजनांच्या अभिसरणाद्वारे पिकांची उत्पादकता वाढवणे, पिक उत्पादनाची शाश्वतता सुनिश्चित करणे तसेच काढणीपश्चात तंत्रज्ञान व पतपुरवठा प्रणाली मजबूत करण्याच्या उद्देशाने देशातील १०० आकांक्षित जिल्ह्यांमध्ये ही योजना राबविण्यात येणार आहे. प्रधानमंत्री धन– धान्य कृषी योजना, नैसर्गिक शेती व कडधान्य अभियान अंतर्गत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी दिल्लीत शुभारंभ कार्यक्रम होणार असून राज्यातील सर्व जिल्हा मुख्यालय, सर्व कृषी विज्ञान केंद्र, सर्व तालुका मुख्यालय, सर्व ग्रामपंचायत, सर्व प्रधानमंत्री किसान समृद्धी केंद्र, सर्व प्राथमिक सहकारी कृषी पतपुरवठा पतसंस्था (झउड), सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्या या ठिकाणी कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. यामध्ये लोकप्रतिनिधी, कृषी व संलग्न विभागातील अधिकारी/कर्मचारी, कृषी विद्यापीठे /कृषी विज्ञान केंद्रांचे शास्त्रज्ञ, कृषी पुरस्कार प्राप्त शेतकरी, पीक स्पर्धा विजेती शेतकरी, नैसर्गिक शेती करीत असलेले शेतकरी, शेतकरी गट/शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित रहावे. या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण https://pmindiawebcast.nic.in या लिंकद्वारे करण्यात येणार आहे. तरी राज्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या कार्यक्रमात आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

## एकनाथ शिंदेंचा....

उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसद रत्न खासदार मा. डॉ. श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या म ार्गदर्शनाखाली शिवसेनेकडून पूरग्रस्तांना मदतीचा हात देण्यात आला. शिवसेना कल्याण लोकसभा मतदारसंघातील कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांच्या नेतृत्वाखाली दि. ९ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी १२ वाजता सिंदफना नदीकाठच्या पूरग्रस्त गावातील शेतकऱ्यांना मदत कीट वाटप करण्यात आले. या उपक्रमाद्वारे पूरग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने दिलासा देण्याचे कार्य करण्यात आले. या वेळी ठाणे उपजिल्हाप्रमुख राजेश कदम आणि बीड शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी सांगितले की, मदतीचे तोरण हेच शिवसेनेचे धोरण आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब व खासदार डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली मदतीचा हात पुढे केला आहे. मदत वाटप कार्यक्रमापूर्वी शिवसेना पदाधिकाऱ्यांनी पंचक्रोशीतील पूरग्रस्त भागाची पाहणी केली. या वेळी उपजिल्हाप्रमुख राजेश कदम, डोंबिवली नगरसेवक राजन मराठे, नगरसेवक अंबरनाथ सुभाष साळुंखे, डोंबिवली युवासेना अध्यक्ष सागर जेधे, उपतालुका प्रमुख राहुल गणपुले, युवासेना विधानसभा अध्यक्ष सूरज मराठे, संजय निकते आदी पदाधिकारी उपस्थित होते. तसेच जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, बीड कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती शामसुंदर पडुळे, शिवसेना, युवासेना, व्हीजेएनटी सेना, शेतकरी सेना व एसटी कामगार सेनेचे पदाधिकारी तसेच लोकप्रतिनिधी उपस्थित होते. या उपक्रमाद्वारे शिवसेनेने पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी पुढाकार घेत आपले सामाजिक बांधिलकीचे धोरण अधोरेखित केले.

## सरन्यायाधीश भूषण...

दिल्या होत्या, त्यामुळे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) पक्षाच्या वतीने या वकिलाचा जाहीर निषेध करून या वकिलावर कडक कार्यवाही करावी अशी मागणी दि.०९.१०.२०२५ रोजी केज येथील तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. हे निवेदन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आंबेडकर पक्षाचे राष्ट्रीय नेते दीपक (भाऊ) निकाळजे यांच्या आदेशाने व मराठवाडा अध्यक्ष भगवंत आप्पा वायबसे यांच्या मार्गदर्शनाखाली दिले आहे. या प्रसंगी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आंबेडकर पक्षाच्या मराठवाडा महिला अध्यक्ष आम्रपाली गजेशिव, मराठवाडा प्रवक्ते ज्ञानेश्वर गिरी, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख बीड बाळासाहेब जाधव,केज तालुका अध्यक्ष आश्रुबा खरात,आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

◆ पान ४ वरून पुढे...

## राज्यपाल हरिभाऊ....

म्हणून ओळख असलेले ज्येष्ठ नेते शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या ८८ व्या वाढदिवसानिमित्त शुक्रवार, दि. ३ ऑक्टोबर पासून गेवराई शहरात श्रीम द् भागवत कथा आणि भव्य किर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. भावरत्न समाधान महाराज शर्मा यांच्या मधूर वाणीतून सुरु असलेल्या भागवत कथेमुळे गेवराईचे वातावरण भक्तिमय झाले आहे. अनेक नामांकित किर्तनकारांची सेवा सप्ताहभर सुरु आहे. शुक्रवार दि.१० ऑक्टोबर रोजी सकाळी १० वा. राजस्थानचे राज्यपाल हरीभाऊ (नाना) बागडे यांच्या हस्ते माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांचा अभिष्टचिंतन सोहळा समि तीच्या वतीने भव्य सत्कार आयोजित करण्यात आला आहे. यावेळी श्री क्षेत्र नारायणगड संस्थानचे मठाधिपती ह.भ.प.शिवाजी महाराज, श्री क्षेत्र चाकरवाडीचे ह.भ.प. महादेव महाराज यांच्यासह साधु, संत–महंत आणि गेवराई तालुक्यातील वारकरी सांप्रदायात काम करणारे किर्तनकार, गायक, वादक यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## भगवानगडाचा आशिर्वाद....

त्यावेळी ते बोलत होते. माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याच्या निमित्तानभगवानगडाचे महंत न्यायाचार्य नामदेव शास्त्री महाराज यांनी भेट दिली. यावेळी शिवछत्र परिवाराच्या वतीने जयसिंग पंडित यांनी शास्त्रींचा सत्कार केला. शास्त्रीजींनी शिवाजीराव दादांचा सत्कार करुन त्यांना शुभाशिर्वाद दिले. यावेळी ह.भ.प. अच्युत महाराज दस्तापुरकर, ह.भ.प. निंबाळकर, प्रकाश सुस्कर यांच्यासह अभिष्टचिंतन सोहळा समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सुदामा कृष्ण भेटीने...

शिवाजीराव पंडित, आ. विजयसिंह पंडित, युवानेते पृथ्वीराज पंडित यांच्यासहहभाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजी मंत्री शिवाजीराव पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त समाधान समाधान महाराज शर्मा यांच्या भागवत कथेचा समारोप झाला. यावेळी गेवराई शहरासह ग्रामीण भागातून भाविक भक्तांनी प्रचंड गर्दी केली होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अभिष्टचिंतन सोहळा समितीने परिश्रम घेतले.

## अंशतः अनुदानित...

वाढीव टप्प्यानुसार या शिक्षकांच्या खात्यात वेतनाची रक्कम जमा झाली नाही. किमान दिवाळी सणाच्या निमित्ताने या सर्व शिक्षकांचे वेतन २० टक्के वाढीव टप्प्यानुसार व्हावे, त्यासाठी लागणाऱ्या निधीची शासनाकडे मागणी करावी या मागणीचे निवेदन बीड जिल्हा विना अनुदानित शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षणाधिकारी श्रीमती प्रियाराणी पाटील मॅडम यांच्यासह वेतन अधीक्षक राजेश खटावकर यांना निवेदनाद्वारे केली आहे. जिल्हयातीलअंशतः अनुदानित शाळेतील शिक्षकांचे ऑक्टोबर म हिन्याचे वेतन वाढीव टप्प्यानुसार करा या मागणीचे निवेदन बीड जिल्हा विना अनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने जिल्हा परिषद माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी प्रियाराणी पाटील मॅडम आणि वेतन अधीक्षक राजेश खटावकर यांना दिले. त्यानंतर शिक्षणाधिकारी श्रीमती प्रियाराणी पाटील मॅडम पदाधिकाऱ्यांशी बोलताना म्हणाल्या की, राज्यातील सर्व विनाअनुदानित शिक्षकांची दिवाळी गोड करण्याचा माझा प्रामाणिक प्रयत्न आहे. त्या दृष्टीने काम सुरू आहे. जिल्ह्यातील अंशतः अनुदानित शाळांना वाढीव टप्प्याप्रमाणे वेतन त्यांच्या खात्यात जमा करण्यासाठी आम्ही वरिष्ठ कार्यालयाच्या सातत्याने संपर्कात आहोत. त्यांचे योग्य मार्गदर्शन मिळताच क्षणांचा ही विलंब न करता आपले वाढीव टप्प्याप्रमाणे वेतन देऊन सर्व अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या खात्यात त्यांचे हक्काचे वेतन जमा करू असे आश्वासन दिले. दुसरीकडे वेतन अधीक्षक राजेश खटावकर यांना ही निवेदन दिले. या वेळी त्यांनी पदाधिकाऱ्यांना आपली मागणी वरिष्ठ कार्यालयाकडे कळवली जाईल व वाढीव टप्प्यासाठी लागणारा आवश्यक निधीची मागणी करून अंशतः अनुदानित शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या खात्यात दिवाळीपूर्वी वेतन जमा करणार असल्याचे सांगितले. दोन्ही अधिकाऱ्यांनी दिवाळीच्या पूर्वी वाढीव टप्प्याप्रमाणे वेतन खात्यात जमा होणार या दिलेल्या आश्वासनांमुळे निश्चितच दिवाळी गोड होईल असा विश्वास व्यक्त करत जिल्ह्यातील अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले. या निवेदनावर विनाअनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा अध्यक्ष वैजनाथ चाटे, छत्रपती संभाजीनगर विभागीय कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे, महिला आघाडीच्या मराठवाडा सचिव श्रीमती मुक्ता मोटे मॅडम, मराठवाडा निरिक्षक विजयसिंह शिंदे, प्राचार्य तुकाराम खाडे, बीड जिल्हा अध्यक्ष आत्माराम वाव्हळ, बीड जिल्हा कार्याध्यक्ष प्रताप पवार, जिल्हा उपाध्यक्ष रामदास जाम कर, अरविंद सौंदलकर, जिल्हा सचिव शेख सर, श्री देशमुख, बीड तालुका अध्यक्ष भागवत यादव, बाळासाहेब नागरगोजे, सय्यद रिजवान, अशोक मोरे, सुरेश कदम, पृथ्वीराज राऊत, नितीन बिनवडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## रमाई आवास....

काही स्थानिक पुढाऱ्या मुळे ही योजना बारगळली,त्या नंतर गेल्या वर्षी नव्याने नाव दाखल करण्यासाठी ठराव देण्याचे ठरले तेव्हा ही,मागास सम ाज बांधवांकडून दहा हजार लाभार्थी असे पैसे घेऊन त्यांना लाभ देण्यासाठी चढावढ झाली.,ही यादी बोगस ग्रामसभा दाखवून आणि पात्रता नसलेला सचिव नेमून सभा कागदोपत्री दाखवली यामध्ये यादी तयार केली त्याचे प्रस्ताव दाखल करण्यात आले,ते काही ऑनलाइन ही करण्यात आले असून अद्याप रमाई आवास घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना अग्रिम हप्ता देण्यात आला नाही.याबाबत पंचायत समितीचे ऑपरेटर यांना वारंवार सांगून ही हप्ते टाकण्यात आलेले नाहीत,काही लाभार्थ्यांचे खाते भरले नाहीत,अनेक लाभार्थ्यांच्या नावा मध्ये बदल करण्यात आला ही शोकांतिका आहे तलवाडा गावाला कोणी वाली नाही,पण गावात स्वतः ला आपण पुढारी आहोत हे समजणारे तरी बोलणार आहेत का ? का गाव वाऱ्यावर सोडले आहे..मागच्या काळात ज्यांच्या हाती सत्ता होती ते अजून सत्ताधारी आम्हीच होणार अशी स्वप्न पाहत आहेत असल्याने सामान्य जनतेला लाभ कधी मिळणार हा खरा प्रश्न आहे. मागासवर्गीय लाभार्थ्यांना आपल्या हक्काचे घर मिळावे त्यांना लाभ द्यावा या उद्देशाने रमाई आवास घरकुल योजना सुरू आहे यध्ये प्रत्येक वर्षी बेघर,वंचित कुटुंबांना घराचा लाभ ग्रामपंचायत स्तरावरून ग्रामसभा घेऊन ठराव मध्ये नाव घेऊन देण्यात येतो,परंतु अनेक ठिकाणी मागासवर्गीय लाभार्थ्यांना बेघर,वंचित कुटुंबाला आपल्या हक्काचे घर मिळावे यासाठी मोठा संघर्ष करावा लागतो,अनेक ठिकाणी आपले नाव घरकुल यादी मध्ये यासाठी दहा दहा हजार रुपये द्यावे लागतात यावेळी दलितांचे नेते आणि पदाधिकारी गप्प बसून गरिबांचे हाल पाहतात ही शोकांतिका आहे असे समाजाचे लोक बोलून दाखवतात.मागील दोन महिन्यापूर्वी तलवाडा ग्रामपंचायत मधून पोइतांडा ग्रामपंचायत वेगळी झाल्याने तलवाडा येथील कार्यकारी मंडळ बरखास्त झाले असल्याने तलवाडा याठिकाणी प्रशासक आहे,त्यामुळे त्यांना काही माहिती नाही आणि देणेघेणे ही नाही परंतु सर्वात सामान्य नागरिकांचे हाल होत आहेत, पीएमवाय घरकुल योजनेचे लाभार्थी ही हप्त्यासाठी परेषण आहेत .याकडे कोणीच लक्ष देत नाहीत,सध्या सेल्फ सर्वे घरकुल योजनेचे यादी मधील लाभार्थ्यांचा मुद्दा समोर असून सेल्फ सर्वे करण्यात आलेल्या लोकांकडून व्हेरिफिकेशन च्या नावाखाली एक हजार ,दोन हजार रुपये घेतल्याची जोरदार चर्चा असून भावी फक्त बघ्याची भूमिका घेत आहेत तर मगचे आम्हाला काही माहीत नाही असे बोलत आहेत.त्यामुळे सामान्य माणसाला कोणी वाली नसल्याचे दिसून येत असून याबाबत अनिरुद्र सानप गटविकास अधिकारी पंचायत समिती गेवराई यांनी लक्ष देऊन उचित कार्यवाही करावी आणि सामान्य माणसाला न्याय द्यावा अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## बीड शहरातील एल्गार...

हा विश्वास आम्हाला पटला आहे, त्यामुळे महाराष्ट्र राज्यात आता मुस्लिम समाज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पाठिशी उभा रहात आहे, जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांनीही आपल्या मनोगतात बीड जिल्हात शिवसेना पुन्हा जोमाने उभी करण्यासाठी मी इमानेइतबारे मेहनत घेत असल्याचा विश्वास दानवे साहेबांना दिला . आपल्या मार्गदर्शनपर भाषणात अंबादास दादा दानवे म्हणाले की , शिवसेना स्थापनेपासून ते आजतागायत मुस्लिम समाजाच्या विरोधात पक्ष कधीच नव्हता,व आजही नाही,साबीरभाई शेख सारख्या निष्ठावंत शिवसैनिक मावळ्याला बाळासाहेब ठाकरे साहेबांनी या महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात स्थान देऊन मुस्लिम समाजाचा गौरव केला होता.आतातर पुर्ण परिस्थिती बदललेली आहे हा समाज आता पुर्ण ताकदीने उद्धवसाहेब यांच्या पाठीशी एकवटत आहे व आपला विश्वास दाखवत आहे.बीड शहरातील शेख बिलाल भाई व तीन नगरसेवकांनी व शेकडो मुस्लिम व हिंदू युवकांनी आज जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांच्या माध्यमातून केलेला प्रवेश अभिनंदनीय आहे येणाऱ्या काळात बीड शहरासह जिल्हात शिवसेना वाढविण्यासाठी मी स्वतः लक्ष घालणार असून पुन्हा गतवैभव प्राप्त करण्यासाठी तुम्ही सर्वांनी मेहनत घ्यावी, तसेच येणाऱ्या नगर परिषद व जि.प. निवडणुकीत पक्षाला घवघवीत यश मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत असे माननीय अंबादासजी दानवे साहेब यांनी आपले मनोगत व्यक्त केले यावेळी मुकेश भैय्या घुमरे, विनोद गुंड पाटील , उपसरपंच बाळासाहेब कुटे , यांच्यासह बीड शहरातील शेकडो मुस्लिम युवक उपस्थित होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

दैनिक मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शुक्रवार, दि. १० ऑक्टोबर २०२५ ● पान ४

# राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या उपस्थितीत होणार शिवाजीराव पंडित यांचा अभिष्टचिंतन सोहळा

## बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे अभिष्टचिंतन सोहळा आयोजन समितीचे आवाहन ; ना. राजन पाटील यांची प्रमुख उपस्थिती

**गेवराई । प्रतिनिधी**




गेवराई तालुक्याचे भाग्यविधाते माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या ८८ व्या वाढदिवसानिमित्त शुक्रवार, दि.१० ऑक्टोबर रोजी सकाळी १० वा. शिवनगरी, र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई येथे भव्य अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. राजस्थानचे राज्यपाल हरीभाऊ (नाना) बागडे, श्री क्षेत्र नारायणगडाचे मठाधिपती ह.भ.प. शिवाजी महाराज, श्रीक्षेत्र चाकरवाडी संस्थानचे महंत ह.भ.प. महादेव महाराज, राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष ना. राजन पाटील यांच्या शुभहस्ते शिवाजीराव पंडित यांचा यावेळी सत्कार करण्यात येणार आहे. त्यानंतर काल्याचे कीर्तन आणि महाप्रसादाने कीर्तन महोत्सवाचा समारोप होणार असून यावेळी हजारोच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन अभिष्टचिंतन सोहळा समितीने केले आहे. गेवराई तालुक्याचे भाग्यविधाते आणि बीड जिल्ह्याच्या राजकारणातील भिष्माचार्य ▶ उर्वरित पान २ वर

### काल्याचे कीर्तन आणि महाप्रसादाने होणार कीर्तन महोत्सवाचा समारोप

**माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यात गेवराई विधानसभा मतदार संघातील सर्व साधु, संत-महंत, किर्तनकार यांचाही हृदय सत्कार अभिष्टचिंतन सोहळा समितीच्यावतीने करण्यात येणार आहे. वाढदिवसानिमित्त होणाऱ्या भव्य सत्कार समारंभानंतर ह.भ.प.शिवाजी महाराज यांचे काल्याचे किर्तन होणार असून त्यानंतर महाप्रसाद वाटप केला जाणार आहे भाविक भक्तांनी त्याचा लाभ घेण्याचे आवाहनही आयोजन समितीने केले आहे.**

### कार्यकर्ते एकत्र येऊन करत आहेत दादांचे अभिष्टचिंतन

**शिवाजीराव पंडित आणि शिवछत्र परिवारावर प्रेम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी एकत्र येवून अभिष्टचिंतन सोहळा समितीच्या माध्यमातून मागील तीन वर्षांपासून किर्तन महोत्सवाचे यशस्वी आयोजन केले आहे. र.भ.आट्टल महाविद्यालयाच्या मैदानावर उभारलेल्या शिवनगरीत गेल्या सप्ताहभर सुरु असलेल्या किर्तन महोत्सवाला भाविक भक्तांनी मोठा प्रतिसाद दिला आहे. याप्रसंगी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन अभिष्टचिंतन सोहळा समितीच्या समितीच्या वतीने करण्यात आले आहे.**

# भगवानगडाचा आशिर्वाद शिवाजीराव दादांच्या पाठीशी आहे : न्यायाचार्य नामदेवशास्त्री महाराज

**गेवराई । प्रतिनिधी**

माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याच्या निमित्ताने गेल्या चार वर्षांपासून भक्तीचा सोहळा चालू आहे. शिवाजीराव दादा ८८ वर्षाचे झाले तरी ते आरोग्याबद्दल आणि लोकांप्रती सजग आहे. या वयातही त्यांचे सर्व तालुक्यावर लक्ष आहे. जुन्या काळातील सर्व गडांचे महंत दादांकडे येऊन गेल्यामुळे त्यांचा आशिर्वाद दादांना



मिळाला आहे. त्यामुळे त्यांना निरोगी आयुष्य मिळाले आहे. दादांना दिर्घायुष्य लाभो, त्यांच्या पाठीशी भगवानगडाचा कायम आशिर्वाद राहतील असे भावोद्गार भगवानगडाचे महंत न्यायाचार्य नामदेव शास्त्री महाराज यांनी काढले. शिवाजीराव पंडित यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्या निमित्ताने आयोजित कीर्तन महोत्सवाला नामदेव शास्त्री यांनी भेट दिली

▶ उर्वरित पान २ वर

## जागर प्रतिष्ठानच्या दणक्याने प्रशासन जागे व शिवप्रेमी नी केलेल्या मागणीला यश

**बीड । प्रतिनिधी**

जागर प्रतिष्ठानच्या वतीने किल्ले धारूर येथील महादुर्ग गडाच्या विकासकामांसाठी वेळोवेळी केलेल्या आंदोलनामुळे व विविध मागण्यासाठी दिनांक ०४ ऑगस्ट २०२५ पासून सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे तसेच तहसील कार्यालय धारूर येथे एकदिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले होते व त्यानंतर ही दैनंदिन पाठपुरावा सुरूच होता याची दखल घेत प्रशासनाने किल्ले धारूर ऐथे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत व दोन



ठिकाणी मार्बलचे माहिती फलकही बसवण्यात येत आहेत असे जागर प्रतिष्ठान चे किसन चव्हाण पाटील यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## सुदामा कृष्ण भेटीने भागवत कथेचा झाला समारोप आज होणार शिवाजीराव पंडित यांचा अभिष्टचिंतन सोहळा

**गेवराई । प्रतिनिधी**

माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या ८८ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित भागवत कथेचा समारोप कृष्ण सुदामा च्या भेटीने करण्यात आला. यावेळी भागवताचार्य समाधान महाराज शर्मा यांनी आपल्या सुश्राव्य वाणीतून भागवत कथेची सांगता केली. यावेळी त्यांनी सुदामा कृष्ण भेट कथन केली त्यावेळेस उपस्थितांच्या डोळ्यात अश्रू उभा




राहिले. याप्रसंगी माजी मंत्री

▶ उर्वरित पान २ वर

## अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षकांचे ऑक्टोबर महिन्याचे वेतन वाढीव टप्प्यानुसार करा

### बीड जिल्हा विना अनुदानित शाळा कृती समितीचे शिक्षणाधिकारी आणि वेतन अधीक्षकांना निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील विना अनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळेतील कार्यरत असणाऱ्या शिक्षक



आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना अनुदानाचा २०% वाढीव टप्पा शासनाने मंजूर केला आहे. शिवाय ०१ ऑगस्ट २०२५ पासून या शिक्षकांच्या खात्यात वाढीव टप्प्यानुसार वेतन देण्याचे शासनाने जाहिर केले. परंतु अद्यापही २० टक्के ▶ उर्वरित पान २ वर

# रमाई आवास घरकुल योजनेचे लाभार्थी दोन वर्षापासून घराच्या प्रतीक्षेत

## मागासवर्गीयांना हक्काच्या घराचा लाभ मिळेना ; दलितांचे पुढारी गप्प ?

**तलवाडा । प्रतिनिधी**

गरीब गरजू, मागास कुटुंबातील बेघर, वंचित कुटुंबाला शासनाकडून मिळणारे हक्काचे घर हे रमाई घरकुल आवास योजने मधून प्रत्येक वर्षी लाभ देण्यात येतो मागील दोन वर्षापासून तलवाडा येथील लाभार्थ्यांना लाभ मिळाला नाही,मागच्या गत दोन वर्षापूर्वी

▶ उर्वरित पान २ वर

### मागासवर्गीय लाभार्थ्यांना त्रास दिल्यास जनआंदोलन उभा करू : भास्कर हातागळे



**रमाई घरकुल आवास योजना ही सामान्य गरीब,गरजू मागासवर्गीय कुटुंबासाठी आहे जे कुटुंब बेघर आहेत,राहण्यासाठी घर नाही,त्यांना आपल्या हक्काचे घर असावे ही भावना सरकार ने डोळ्यासमोर ठेवून राबवली आहे.परंतु यामध्ये गाव पुढाऱ्यांनी राजकारण करून वंचित समाजाला वेठीस धरण्याचे काम केले आहे.त्यामुळे येत्या काळात जर रमाई आवास घरकुल योजनेत कोणी राजकारण केले तर आम्ही सहन करणार नाहीत,आणि गेवराई पंचायत समिती कार्यालय येथे मागासवर्गीय लाभार्थ्यांना त्रास दिल्यास जनआंदोलन उभारू असा इशारा ग्राम संवाद सरपंच संघटनेचे संपर्क प्रमुख तथा गंगावाडी ग्रामपंचायत चे सरपंच भास्कर हातागळे यांनी दिला आहे.**

## आरक्षण सोडतीस उपस्थित राहण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद व त्याअंतर्गत पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूका २०२५ आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहिर झाला असून सोमवार दि.१३ ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हा परिषद निवडणूककांकरिता आरक्षण सोडत काढण्याबाबत सूचित केले आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार दि. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी १.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभगृहामध्ये जिल्हा परिषद आरक्षण सोडत बैठक आयोजित केली आहे. या बैठकीस मान्यताप्राप्त राजकीय पक्षांचे पदाधिकारी तथा जिल्हा परिषद व जिल्हयातील सर्व पंचायत समितीचे पदाधिकारी, नागरिक यांनी बैठकीस उपस्थित रहावे व आपले आधार कार्ड ई. ओळखपत्र सोबत ठेवावे, असे (सा.प्र.) चे उपजिल्हाधिकारी शैलेस सुर्यवंशी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# बीड शहरातील एल्गार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शेख बिलाल यांच्यासह तीन नगरसेवकांनी बांधले शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शिवबंधन

- बीड जिल्हा शिवसेनेला पुन्हा गतवैभव प्राप्त करून देऊ : अंबादास दानवे
- शिवसेना वाढविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करत आहे : जिल्हाप्रमुख गणेश वरेकर

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव साहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली व शिवसेना नेते तथा विरोधी पक्षनेते अंबादास दानवे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर व तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांच्या प्रमुख उपस्थितीत आज बीड शहरातील एल्गार संघटनेचे संस्थापक



अध्यक्ष शेख बिलाल भाई व माजी नगरसेवक शेख नजीब, माजी नगरसेवक शेख मुजीबभाई , माजी नगरसेवक सय्यद फारुख यांच्यासह डॉ. शेख आसिफ शोएब , समीर शेख, फारुख सय्यद, सय्यद शफिक,शेख समीर यांनी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे साहेब यांच्या हस्ते व जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शिवबंधन हाती बांधून अधिकृत प्रवेश केला.यावेळी बिलालभाई व तिन्ही नगरसेवकांनी मनोगतात सांगितले, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे पासुन पुढे उद्धवसाहेब ठाकरे हे मुस्लिम समाजाच्या कधीच विरोधात नव्हते,

▶ उर्वरित पान २ वर

# थोडक्यात...

## 13 ऑक्टोबर हा दिवस आपत्ती धोके निवारण दिवस म्हणून साजरा करण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

संयुक्त राष्ट्र संघाने घोषित केल्यानुसार राज्यस्तरावर आणि जिल्हा स्तरावर दर वर्षी १३ ऑक्टोंबर हा दिवस आपत्ती धोके निवारण दिवस म्हणून साजरा करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. राज्य शासनाने दिनांक ०८ सप्टेंबर २०१७ रोजी शासन परिपत्रक निर्गमित करुन दरवर्षी सर्व जिल्ह्यांमध्ये व राज्य पातळीवर दिनांक १३ ऑक्टोबर हा दिवस आपत्ती धोके निवारण दिवस म्हणून साजरा करण्याचे तसेच सर्व जिल्ह्यांमध्ये या दिवशी रंगीत तालीम घेण्याच्या सूचना निर्गमित केल्या आहेत. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण नवी दिल्ली, (छज्न-) यांनी नागरिकांना आपत्ती प्रतिसादासाठी कटिबद्ध होण्यासंदर्भात सन २०२३ या वर्षी प्रतिज्ञा तयार केली असून सदर प्रतिज्ञा घेण्याचा कार्यक्रम सर्व शासकीय कार्यालयात आयोजित करण्याचे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी यांना सुचित करण्यात आले आहे. बीड जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयामध्ये दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता आपत्ती प्रतिसादासाठी कटिबद्ध होण्यासंदर्भात प्रतिज्ञा घेण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात यावा, असे निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा अपत्ती व्यवस्थान प्राधिकरणचे शिवकुमार स्वामी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

## छ. शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाचे आज माजलगावात भुमिपुजन

**माजलगाव । प्रतिनिधी**



शहरातील छत्रपती शिवाजी महाराज व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरूषांच्या स्मारकाचा भुमिपुजन सोहळा दि. १० ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे. उद्घाटक म्हणुन आमदार प्रकाश सोळंके हे तर अध्यक्षस्थांनी जिल्हाप्रमुख अनिल जगताप तसेच विशेष उपस्थितीत मा. आ. डि. के. देशमुख, मा. आ. मोहनराव सोळंके, मा. आ. राधाकृष्ण होके पाटील, बाबुराव पोटभरे यांची उपस्थिती असणार आहे तर प्रमुख उपस्थितीत जयसिंह सोळंके, डॉ. प्रकाश आनंदगांवकर, बाजीराव चव्हाण, अच्युत लाटे, दयानंद स्वामी, रोहित देशमुख, खुर्शिद नाईक, सभापती जयदत्त नरवडे, संभाजी शेजुळ, अरूण राउत, अविनाश जावळे, खलील पटेल, विजय साळवे, नितीन नाईकनवरे, कचरू खळगे, तुकाराम येवले, चंद्रकांत शेजुळ, सुरेंद्र रेदासणी, डॉ. अशोक तिडके, धनंजय सोळंके, भास्कर शिंदे, राजेंद्र होके, विनायक रत्नपारखी, अर्जुन नाईकनवरे, धम्मानंद साळवे, राजेश घोडे, अभिजित कोंबडे, अमोल शेरकर, कवाडे गटाचे सिध्दार्थ ससाणे, राकेश साळवे, आगारप्रमुख सुहास कोळपकर, मुख्याधिकारी पोपट निघळ, यांची उपस्थिती असणार आहे.

## बीड जिल्हास्तर शालेय कबड्डी क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बीड व जिल्हा क्रीडा परिषद बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बीड जिल्हा स्तरीय शालेय कबड्डी क्रीडा स्पर्धा २०२५-२६ दि ०७ व ०८ ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हा क्रीडा संकुल इनडोअर हॉल येथे उत्साहात संपन्न झाल्या. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बीड शहर पोलिस निरीक्षक मा. शितलकुमार भल्लाळ तसेच बीड ग्रामीण सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळराजे दराडे यांची उपस्थिती लाभली, तसेच स्पर्धेसाठी पंचप्रमुख महादेव रकटे, भिमराव माने, अभिजित तांदळे, सतिश उबाळे, प्रताप शेंडगे,जनार्धन काळे, अमोल तांदळे, बापु गाडीवाल, अंकुश गव्हाने, शुभम कादे, सोमा गायकवाड, गणेश पवार, प्रियंका नवले, आदी मान्यवरांच्या उपस्थितीत बीड तालुका क्रीडा अधिकारी रेवन्नाथ शेलार व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाचे क्रीडा संयोजक जितेंद्र आरक यांच्या हस्ते मान्यवरांचे स्वागत करून स्पर्धेचे उद्घाटन संपन्न झाले. सदरील स्पर्धेत बीड जिल्हा अंतर्गत विविध शाळा व महाविद्यालयांच्या १४/१७/१९ वर्ष आतील मुले व मुलींनी सहभाग नोंदवत विशेष कामगिरी केली. वरील वयोगटातील संघांनी मारलेल्या बाजीमुळे हे संघ विभागस्तरीय होणार्या स्पर्धेसाठी पात्र ठरले. हे संघ छत्रपती संभाजी नगर येथे आयोजित करण्यात आलेल्या विभाग स्तरीय कबड्डी स्पर्धेत बीड जिल्हाचे प्रतिनिधीत्व करणार आहेत.वरील सर्व संघ, त्यांचे विद्यालय,महाविद्यालय तसेच त्यांचे प्रशिक्षक,मार्गदर्शक यांना प्रमुख पाहुणे, उपस्थित मान्यवर व कार्यालयाच्या वतीने पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## श्री शिवानंद आश्रम तमलूर-मदनूर ते श्रीक्षेत्र कपिलाधार २४ वी पायी पदयात्रा

**बीड । प्रतिनिधी**



त्रिकाल वंदनीय परमपूज्य गुरुवर्य श्री. ष.ब्र.१०८ शिवानंद शिवाचार्य महाराज तमलूरकर यांच्या कृपा, आशीर्वाद आणि मार्गदर्शनाखाली श्री शिवानंद आश्रम, तमलूर-मदनूर ते श्रीक्षेत्र कपिलाधार या २४ व्या पायी पदयात्रेचे आयोजन यंदा भक्तिमय वातावरणात करण्यात आले आहे. ही पवित्र यात्रा शनिवार, दि. २५ ऑक्टोबर २०२५ रोजी शिवानंद आश्रम, तमलूर येथून प्रारंभ होऊन बुधवार, दि. ५ नोव्हेंबर २०२५ रोजी श्रीक्षेत्र कपिलाधार येथे कार्तिक शुद्ध पौर्णिमेच्या दिवशी संपन्न होणार आहे. गुरुवर्यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या २३ वर्षांपासून पारंपरिक पद्धतीने होणारी ही पदयात्रा भाविकांसाठी आध्यात्मिक साधना, भक्तिभाव आणि आत्मशुद्धीचा महोत्सव ठरली आहे. या यात्रेचा उद्देश साधकांना सांसारिक चिंतामुक्त करून आत्मविकास आणि परमात्मप्राप्तीचा अनुभव देणे हा आहे. दररोज पठण, पारायण, शिवपाठ, भजन-कीर्तन, गुरुआमृत उपदेश अशा कार्यक्रमांनी ही यात्रा दरवर्षी भक्तिभावाने रंगते. यात्रेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक भक्ताला शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक समाधानाचा अनुभव मिळतो.साधू संत तुझे अवतार जाण तयाती शरण नाही गेलो. जाती-कुळगोत्र न पाहे शंकर, भक्तांचा माहेर स्वामी माझा तमलूरहून सुरू होणारी ही पदयात्रा नरंगल, देगलूर, कावळगाव, करडखेड, मुक्रमाबाद, हाळणी, उदगीर, लोहारा, चामरगा, रेणापुर, बर्दापूर, आंबेजोगाई, धारूर, विडा, कळसंबर, रत्नागिरी मार्गे श्रीक्षेत्र कपिलाधार येथे पोहोचेल.